-: प्रेसनोट दिनांक- १७/०१/२०२२ :-

**दिग्वीजय पांडूरंग मर्दाने, वय ३५, पोकॉ/१४७८, नेम. लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे, कोल्हापूर, रा. मु.पो. शिंगणापुर, ता. करवीर, जि. कोल्हापूर यांचे लाच मागणीबाबत.........**

---

यातील तक्रारदार यांचेविरूध्द लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयाचे तपासामध्ये मदत करणेसाठी ५०,०००/- रू. लाचेची मागणी करून त्यावेळीच २५,०००/- रू. लाच स्विकारली असुन उर्वरित २५,०००/- रू. लाचेची मागणी करत असलेबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे पडताळणी केली असता, दिनांक २७/१२/२०२१ रोजी लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे येथे पोकॉ/१४७८ मर्दाने यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचेविरूध्द दाखल गुन्हयामध्ये त्यांना मदत करणेसाठी गुन्हयाच्या तपासी अधिकारी यांचेसाठी २५,०००/- रू. लाच स्विकारलयाचे मान्य करून आणखीन १०,०००/- रूपये लाचेची मागणी केलेचे निष्पन्न झाले आहे. त्यावरून पोकॉ/१४७८ दिग्वीजय मर्दाने, लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे यांना आजरोजी ताब्यात घेण्यात आले आहे.

सदरबाबत फिर्यादी श्री. धीरज अनिल साखळकर, वय ३७, व्यवसाय -डेव्हर्ल्पस, रा. एव्हरग्रीन होम,नागाळा पार्क जि. कोल्हापूर यांचे फिर्यादीवरून आरोपी लोकसेवक दिग्वीजय पांडूरंग मर्दाने, वय ३५, पोकॉ/१४७८, नेम. लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे, कोल्हापूर, रा. मु.पो. शिंगणापुर, ता. करवीर, जि. कोल्हापूर यांचेविरुध्द लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरू आहे.

**सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा. श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा. श्री. सुहास नाडगोडा, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व मा. श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांचे मार्गदर्शनानुसार, पोहेकॉ शरद पोरे, पोकॉ मयुर देसाई,संदीप पडवळ ,रूपेश माने ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.**

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कमांकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३,

४) कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

५)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४,

६) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.

Scanned by TapScanner